भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०१/२०१८

**१) मती मंद महिलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १५/०१/२०१८ चे १४.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीला पिडीत स्त्री ही मंद बुध्दीची असल्याचे माहीत असुन शुध्दा तीला जेवन करण्याचे बहाण्याने फिर्यादीचे व साक्षदाराचे समक्ष त्याचे घराचे स्वयपांक खोलीत नेवुन बाथरूम मध्ये जबरी संभोग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७६(२)(एल) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १६/०१/२०१८ चे १९.३० वा ते २१.०० वाजता. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणालाही काही न सांगता घरुन निघुन गेली तिचा गावामध्ये रिश्तेदारीत शोध घेतला असता, मिळुन न आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) सोन्याचा मंगळसुत्रांची चोरी . :-**

दिनांक १७/०१/२०१८ चे १४.३० वाजता. दरम्यान फिर्यादी सौ. ललीता मदन मेश्राम वय ४० वर्ष, रा. रेंगेपार ही आपले बाथरुमध्ये आंगोळ करते वेळी गळयातुन काढुन ठेवलेले एक मंगळसुत्र किंमती १६,०००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) तोंडातोंडी भांडण करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १८/०१/२०१८ चे १०.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी रामचंद्र मुकाजी वासनीक वय ५९ वर्ष रा. साखरा हा गावातील राहणारा दामु दोनोडे यांचे घरासमोरील रोडवर उभा असता, यातील आरोपीने त्याठीकाणी जाऊन फिर्यादी ला पाहुन तु माझे बाधकाम केलेल्या संडासचे पैसे का देत नाही म्हणुन तोंडा-तोंडी भांडण करून शिवीगाळ केली व हातातील काठीने फिर्यादीचे डावे हातावर दोन ते तिन वेळा काठी मारून जखमी करून जमीनीवर पाडले व मारण्या-पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२५,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून एकाचा मृत्यु व एकाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २०/०१/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील उसाने भरलेला दोन पिवळया रंगाच्या ट्रॉली असलेल्या ट्रॅक्टरच्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही सेंदुरवाफा नटराज बार येथे रहदारीस अडथडा निर्माण होईल अशा ठिकाणी बेदरकारपणे व निष्काळजीपणे उभा करून कोणतेही रिपलेक्टर न लावता आरोपी हा ट्रॅक्टर सोडुन निघुन गेला व मागेहुन येणारी मोटार सायकल क्र. एमएच ३६ ए ८८०६ चा चाकल रूषी वक्टु लांजेवार वय ५५ वर्ष रा. विरसी यास ट्रॅक्टर न दिसल्याने ट्रॅक्टरला जावुन धडकल्याने त्यास गंभिर दुखापत होवुन मरण पावल्याने व मागे बसलेली पत्नी सौ. कल्पना लांजेवार ही जखमी झाली आरोपी ट्रॅक्टर चालक हा त्याचे मरणास व त्याचे पत्नीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादी होमरात विश्वनाथ कापगते वय ३१ वर्ष रा. विरसी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४(अ)(ब)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी फुकट पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २०/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, तुमसर, अडयाळ व दिघोरी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू किंमती ३,०००/–रु, तसेच जुगारातुन किंमती ४०,२१०/–रु. असा एकुण किंमती ४३,२१०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २०/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– १५ केसेस व ईतर वाहनांवरती – ८६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.